# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/मा.तं.विभाग/ ६९९७७/२०१३.

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : - 5 MAR 2013

## परिपत्रक

**विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा पोटभाडयाने (Sub-letting) देणेबाबत..**

सदर्भ :- १. परिपत्रक क्र.मऔविम/विधी व कामकाज विभाग/ ९०/२००९, दिनांक २९.१०.२००९.
२. परिपत्रक क्र.मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/विधी विभाग/ ११०, दिनांक २६.०५.२०१०.

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील इमारतीमधील तसेच माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा पोटभाडयाने देण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आली आहेत. सदरहू परिपत्रकानुसार भूखंडावरील बांधीव इमारतीमधील जागा पोटभाडयाने देताना पोटभाडे शुल्क औद्योगिक अथवा व्यापारी वापरानुसार त्या-त्या वर्षीच्या प्रचलित दराच्या ३ टक्के प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे प्रत्यक्ष भाडयाने दिलेल्या क्षेत्रावर आकारण्यात येत होते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली घसरण, जागतिक औद्योगिक/आर्थिक मंदी तसेच या क्षेत्रातील उद्योजकाकडून पोटभाडयापोटी आकारण्यात येत असलेले दर कमी करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या सूचना/निवेदने विचारात घेता, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा (बांधीव क्षेत्र) पोटभाडयाने देण्यासाठी पोटभाडे शुल्काचे दर कमी करण्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १८.१२.२०१२ रोजी झालेल्या ३४८ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सादर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ५१६५ पारीत करण्यात आला. सदर ठरावाचे अनुषंगाने, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील तसेच औद्योगिक भूखंडावर माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यासाठी अथवा औद्योगिक भूखंडाचे रुपांतर माहिती तंत्रज्ञान प्रयोजनात करण्यास परवानगी देण्यात आली असेल, अशा माहिती तंत्रज्ञान उद्यानातील/भूखंडावरील इमारतीतील बिल्टअप क्षेत्र पोटभाडयाने देताना पोटभाडे शुल्क औद्योगिक अथवा व्यापारी वापरानुसार त्या-त्या वर्षीच्या प्रचलित प्रिमियम दराच्या ३ टक्के प्रती चौ.मी. प्रती वर्ष ऐवजी १ टक्का प्रती चौ.मी. प्रती वर्ष असे आकारण्यात यावे.

भूखंडधारकाने व भाडेकरुने विनंती केल्यास, कमाल १० वर्षाच्या कालावधीपर्यंत पोटभाडयाची परवानगी देण्यात यावी. भूखंडधारकांने कमाल १० वर्षाच्या मर्यादेत विशिष्ट कालावधीकरिता (उदा. ३,५,७ वर्षाकरिता) पोटभाडयाची परवानगी मागणी केल्यास, त्या कालावधीचे आगाऊ पोटभाडे शुल्क एकरकमी वसुल करुन पोटभाडयास परवानगी देण्यात यावी.

पोटभाडयाने जागा (बांधीव क्षेत्र) वापरण्यास परवानगी दिलेल्या कालावधीत भूखंड वाटपाच्या दरात वाढ झाल्यास, पोटभाडे शुल्काच्या फरकाच्या रक्कमेची मागणी करण्यात येऊ नये.

उपरोक्त बदलाव्यतिरिक्त उपरोक्त संदर्भिय परिपत्रकातील इतर अटी व शर्तींमध्ये बदल करण्यात आलेला नाही.

सदरहू धोरण या परिपत्रकाच्या दिनांकापासून फक्त माहिती तंत्रज्ञान उद्यानातील तसेच औद्योगिक भूखंडावर माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यासाठी अथवा औद्योगिक भूखंडाचे रुपांतर माहिती तंत्रज्ञान प्रयोजनात करण्यास परवानगी देण्यात आली असेल, अशा माहिती तंत्रज्ञान उद्यानातील/भूखंडावरील इमारतीतील बांधीव (बिल्ट-अप) क्षेत्र पोटभाडयाने देण्याकरिता लागू राहिल, याची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(डॉ. विजय सूर्यवंशी)
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई